नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. १३/०८/२०२६

**पुणे महानगरपालिका**
**मा.महिला व बालकल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. ०८**

**महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार, दि.१९/०८/२०२६ रोजी दुपारी ३:३० (तीन वाजून तीस मिनिटे) वाजता समिती सभागृह नविन विस्तारित इमारत, दुसरा मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे - ४११००५ येथे भरेल.**
**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ११४**
**मा. अतुल तरवडे व मा. प्राची आल्हाट यांचे दि.१०/०८ /२०२६ रोजीचे पत्र.**

भारत सरकारसोबत नशा मुक्त भारत अभियानांतर्गत झालेल्या सामंजस्य कराराच्या (MoU) अनुषंगाने, मेडिकल विंग (Rajayoga Education & Research Foundation) यांच्या मार्फत दिनांक ६ ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत देशव्यापी "नशा मुक्ती प्रतिज्ञा पंधरवडा" आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमाचा उद्देश सुमारे ४ कोटी नागरिकांना, विशेषतः युवक/युवती व विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेण्यासाठी प्रेरित करणे हा आहे.

विद्यार्थी व युवकांना या प्रतिज्ञेसाठी प्रेरित करून, आपण सर्वजण मिळून व्यसनमुक्त, तणावमुक्त व निरोगी समाज घडवू शकतो. "Say No to Drugs, Say Yes to Life" (व्यसनाला नाही म्हणा, जीवनाला हो म्हणा) हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने, राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, यासाठी आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, राज्य, पुणे तसेच संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र. ११५**
**मा. बाळा उर्फ प्रमोद ओसवाल व मा. महेश ना. वाबळे यांचे दि.१२/०८ /२०२६ रोजीचे पत्र.**

प्रभाग क्र.३९ ड पुणे महानगरपालिकेने बांधलेले बिबवेवाडी येथील महावीर उद्यानामध्ये शौचालय बांधण्यात आलेले आहे. तरी सदरचे शौचालय जीर्ण झाले असून त्यावरती झाडे उगवली आहे. त्यामुळे शौचालयाला पूर्णपणे गळती लागली असल्या कारणामुळे ते शौचालय नव्याने बांधणे गरजेचे आहे. सदरच्या कामाकरिता सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

त्याच बरोबर महिला आणि पुरुष यांना जाणे येणे साठी मध्यभागी फक्त एक भिंत असून गेट मात्र एकच आहे. सदरच्या जागी नेहमी वादविवाद निर्माण होत असतात.

त्यामुळे पुरुष आणि महिलां करिता वेगळे शौचालय बांधणे गरजेचे असले कारणाने, सद्य परिस्थिती मध्ये असलेले शौचालय पाडणेस व नव्याने बांधण्याकरिता मान्यता देण्यात यावी.

## <u>मा.महा.आयुक्त यांच्या कडून आलेले पत्र</u>

**<u>विषय क्र. ११६</u>**

विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नदीपात्रा लगतचे घरांक क्र.२१४/२१५/२१६ शनिवार पेठ येथील सार्वजनिक मुतारी पाडणे बाबत मा.अति. महापालिका आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उआ परि ५/३७०, दि.०४/०८/२०२६ चे पत्र.

**<u>विषय क्र. ११७</u>**

माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या १० शाळा आयटीच मुव्हमेंट या संस्थेने दिलेल्या प्रती विद्यार्थी प्रती वर्ष रू.२९०००/- इतक्या दरास मान्यता मिळणे, आयटीच मुव्हमेंट या संस्थेस कार्यादेश देणे, आयटीच मुव्हमेंट यांचेसोबत करारनामा करणे व आयटीच मुव्हमेंट यांना देयक अदा करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माध्यमिक/३७५ दि.०५/०८/२०२६ चे पत्र.

**<u>विषय क्र. ११८</u>**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये माध्यमिक शिक्षण विभागाकडील विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणे कामी डीबीटी (DBT) प्रणाली राबविणेबाबत मा. महिला व बालकल्याण समिती मार्फत मा. स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माध्यमिक/३७६ दि.०५/०८/२०२६ चे पत्र.

## <u>मागील सभेचे विषय</u>

**<u>विषय क्र. ११९</u>**

**मा. किशोर लता विष्णू धायरकर व मा.कु.हिमाली नवनाथ कांबळे यांचे दि.०८/०७/२०२६ रोजीचे पत्र.**

प्रभाग क्र. १४ ब, मधील गायकवाड आळी, राम मनोहर लोहिया सोसायटी शेजारी जुने जीर्ण झालेले शौचालय असून, अनेक वर्षापासून ते वापरत नाही. त्यामुळे तेथे रात्रीच्या वेळेस अनैतिक प्रकार घडत आहेत. याबाबत तेथील नागरिक आमचेकडे शौचालय पाडण्याबाबत वारंवार तक्रार करीत आहेत.

तरी सदरचे शौचालय पाडण्यात यावे.

**(टिप: सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.०४/०८/२०२६ रोजीच्या सभेत ठरले होते.)**

**<u>विषय क्र. १२०</u>**

पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्प अंतर्गत बंडगार्डन पूल ते मुंढवा पूल स्ट्रेच १० व ११ मधील नदीच्या उजव्या बाजूकडील कोरेगाव पार्क येथील संगमवाडी टी.पी स्कीम येथील बाधा ठरत असलेले शौचालय पाडणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.१/२७७,दि.१३/०७/२०२६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**(टिप: सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.०४/०८/२०२६ रोजीच्या सभेत ठरले होते.)**

**<u>विषय क्र. १२१</u>**

**मा. ॲड.अब्दुल गफुर अं पठाण यांचे दि.१६/०६ /२०२६ रोजीचे पत्र.**

मा. मुख्य सभा दिनांक २०/०८/२०२५ ठराव क्रमांक १७३ ठरावानुसार पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील संत गाडगे महाराज शाळेजवळ, कोंढवा खुर्द या शाळेबाबत सादर केलेल्या अहवाला मध्ये इंग्रजी माध्यम मनपा शाळा क्रमांक ८२बी व उर्दु माध्यम मनपा शाळा क्रमांक १२२ बी यांचे ताब्यात असून संबंधित मुख्याध्यापक यांनी शालेय इमारतीतील दोन वर्ग खोल्या रिकाम्या असून उर्दु माध्यमिक विद्यालयासाठी उपलब्ध करुन देण्याची लेखी हमी दिलेली असल्याने पुणे महानगरपालिके कडील प्राथमिक शिक्षण विभागाकडुन संत गाडगे महाराज शाळा कोंढवा खुर्द या शाळेत उर्दू माध्यमाचे इयत्ता ९वी व इयत्ता १०वी वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे असे नमुद केलेले आहे.

तथापि पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडुन संत गाडगे महाराज कोंढवा खुर्द या शाळेत उर्दु माध्यमाचे इयत्ता ९वी व इयत्ता १० वीचे वर्ग सुरु करणे खुप अडचणीचे होत आहे व प्राथमिक विभागाकडे अध्यापनासाठी शिक्षक उपलब्ध नाहीत, तथापि सध्या परिस्थितीत मा. शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग यांनी १०० टक्के अनुदानित शाळा रफी अहमद किडवाई माध्यमिक विद्यालयाकडील शिक्षक दररोज अध्यापनासाठी त्या शाळेत उपलब्ध करुन दिले आहेत. त्यामुळे संत गाडगे महाराज उर्दु माध्यम शाळा क्र. १२२बी कोंढवा खुर्द या शाळेत सुरु करण्यात आलेले उर्दु माध्यमाचे इयत्ता ९वी व इयत्ता १०वीचे वर्ग रफी अहमद किडवाई उर्दु माध्यमिक विद्यालय या शाळेची भाग शाळा म्हणुन करणे योग्य होईल.

मा.मुख्य सभा दिनांक २०/०८/२०२५ ठराव क्र. १७३ चा फेर विचार करुन पुणे महानगरपालिके कडील प्राथमिक शिक्षण विभागाकडुन संत गाडगे महाराज उर्दु माध्यम शाळा क्र. १२२बी कोंढवा खुर्द या शाळेत सुरु करण्यात आलेले उर्दु माध्यमाचे इयत्ता ९वी व इयत्ता १०वी वर्ग रफी अहमद किडवाई उर्दु माध्यमिक विद्यालय या शाळेची भाग शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात यावी.

**(टिप: सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.०४/०८/२०२६ रोजीच्या सभेत ठरले होते.)**

**योगिता भोसले**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**